# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२
# मा. प्रकल्प संचालक यांचे अध्यक्षतेखालील ऑनलाईन बैठक दिनांक-१०.१.२०२५ चे इतिवृत्त

उपस्थिती - प्रकल्प टप्पा-२ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/ प्रकल्प संचालक (आत्मा)/ उपविभागीय कृषि अधिकारी

बैठकीमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील समाविष्ट जिल्ह्यांचे **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा)** आणि **उपविभागीय कृषि अधिकारी** यांचे स्वागत करून मा. प्रकल्प संचालक यांनी प्रकल्प अंमलबजावणी करण्यासाठी तातडीने करावयाच्या उपक्रमांबद्दल विस्ताराने मार्गदर्शन केले. बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सूचना व माहिती देण्यात आली.

१. जिल्ह्यातील प्रकल्पाशी संबधित सर्व अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांची बैठक घेवून प्रकल्पाविषयी माहिती द्यावी.
२. जिल्हा माहिती अधिकारी यांचेमार्फ़त प्रकल्पाविषयी पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.
३. **ग्राम कृषि विकास समिती** (GKVS)
   १. कृषि व पदुम विभाग सा नि. क्र. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ८१/३ अ, दि. ९ सप्टेंबर २०२० अन्वये विहीत केलेल्या रचनेनुसार ग्रामपंचायत स्तरावर ग्राम कृषि विकास समिती झालेली आहे याची खात्री करून जेथे सदर समिती गठीत केलेली नसेल अशा ठिकाणी प्राधान्याने GKVS ची स्थापना करून घेण्यात यावी. **दि. २६.१.२०२५** च्या ग्रामसभेमध्ये सदर समितीचे गठन विषयक प्रक्रिया पूर्ण करावी
   २. ग्राम कृषि विकास समित्यांची स्थापना सर्व ग्रामपंचायतींमध्ये झाल्याचे प्रमाणपत्र जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी विभागीय कृषी सहसंचालक यांचे मार्फत **दि. ३१.१.२०२५** रोजी सादर करावे
   ३. GKVS ची माहिती कृषी सहाय्यकांनी प्रकल्पाच्या पोर्टलवर भरावी. त्यासाठी पोर्टलचे लॉगीन credentials उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

२. सरपंच प्रशिक्षणविषयक करावयाची कार्यवाही
   १. प्रकल्पातील गावांचे संबंधित सरपंचांचे प्रकल्प विषयक प्रशिक्षण यशदा, पुणे या संस्थेने प्राधिकृत केलेल्या प्रशिक्षण संस्थांमध्ये दि. १५ जानेवारी २०२५ पासून नियोजित आहे.
   २. सरपंच प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनास उपस्थीत राहून सरपंचांनाप्रकल्पाच्या उद्देशाबाबत मार्गदर्शन करावे.
   ३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी यांना यांचेशी संपर्कात राहून सरपंचांची १०० टक्के उपस्थिती राहील यासाठी सक्रिय प्रयत्न करावेत.
   ४. सरपंच प्रशिक्षणाकरिता उपविभागीय कृषि अधिकारी हे नोडल अधिकारी असतील उपविभागीय कृषि अधिकारी यांनी जिल्ह्याशी संबंधित प्रशिक्षण संस्थांचे समन्वयक यांचे संपर्कात राहून, यशदा, पुणे यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी समन्वयन करावे.
   ५. सरपंच प्रशिक्षणामध्ये प्रत्येक बॅचमध्ये उपस्थित राहाण्यासाठी एक मंडळ कृषी अधिकारी / कृषी पर्यवेक्षक / कृषी सहाय्यक यांची आणि प्राधान्याने महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

६. तालुका कृषि अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांचेशी संपर्कात राहून तालुक्यातील सरपंच वेळापत्रकानुसार प्रशिक्षण सत्राकरिता हजर राहातील याची खात्री करावी.

७. सरपंच पुस्तिका थेट प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर पुस्तिका सर्व उपस्थी सरपंचांना मिळाल्याची खात्री करावी .

४. **प्रकल्प अधिकारी/ कर्मचारी यांचे सूक्ष्मनियोजन विषयक प्रशिक्षण बाबत करावयाची कार्यवाही**

प्रकल्पातील प्रत्येक गावाचे सूक्ष्म नियोजन करून गाव हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्यात यावा. यासाठी संबधित कृषी सहाय्यकांना रामेति येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर तीन दिवसीय प्रशिक्षणास कृषि पर्यवेक्षक/ कृषि सहाय्यक १००% उपस्थित राहातील याची दक्षता घ्यावी.

५. लोकसहभागी पद्धतीने सूक्ष्मनियोजन **वेळापत्रक** आखणी विषयी करावयाची कार्यवाही

१. सुक्ष्मनियोजन प्रक्रिया लोकाभिमुख होण्यासाठी या प्रक्रियेची माहिती व त्यातून तयार करण्यात येणारा आराखडा याबाबत स्थानिक वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी द्यावी.

२. प्रत्येक गावाची सुक्ष्मनियोजन बाबत पूर्वतयारीची माहिती प्रकल्पाने सूक्ष्मनियोजनसाठी तयार केलेल्या App मध्ये भरण्यात यावी.

३. प्रत्येक गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार करण्यासाठी प्रकल्पाच्या Water Balance App मध्ये आवश्यक ती माहिती भरण्यात यावी.

४. सूक्ष्म नियोजन आणि पाण्याचा ताळेबंद या दोन्ही मोबाईल App बद्दल online प्रशिक्षण माहे जानेवारीच्या तिस-या आठवड्यात नियोजित आहे. यासाठी कृषि सहाय्यक आणि सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी उपस्थित राहावे.

५. सरपंच व कृषि सहाय्यक यांचे प्रशिक्षण सत्र जशी पूर्ण होत जातील त्या अनुषंगाने गावनिहाय सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचे वेळापत्रक तयार करावे.

६. सुक्ष्मनियोजन स्वयंसेवकांची निवड करावी.

प्रत्येक गावातील सुक्ष्मनियोजन प्रक्रियेमध्ये कृषी सहाय्यकांना मदत करण्यासाठी आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवकांची निवड करण्यात यावी. गावनिहाय निवड करण्यात येणा-या स्वयं सेवकांमध्ये ५० % महिला असाव्यात. यासाठी स्थानिक, स्वयंप्रेरणेने पुढे येणाऱ्या जाणकार युवकांची स्वयंसेवक म्हणून निवड करण्यात यावी. स्वयंसेवकाचे वय १८-३५ वर्षे च्या दरम्यान असावे, शिक्षण किमान १० वी पर्यंत असावे. मोबाईल ॲप वापराचे ज्ञान तसेच संवाद कौशल्य आवश्यक आहे. स्वयंसेवक निवड निश्चिती ग्राम कृषि विकास समितीच्या ठरावाद्वारे करण्यात यावी. सुक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता सदर स्वयंसेवकांना प्रति दिन ३०० रूपये मानधन देण्यात येणार आहे. स्वयंसेवक निवडीची कार्यवाही दि. १.२.२०२५ पर्यंत पूर्ण करून घ्यावी.

स्वयंसेवकांची गावनिहाय संख्या पुढीलप्रमाणे ठरविण्यात यावी. पेसा गावांकरिता वाड्या/पाड्यानुसार अधिकचे स्वयंसेवक निवड करण्यास मुभा आहे.:

| गावाचे जनगणना, २०११ नुसार भौगोलिक क्षेत्र हेक्टर | <५०० | ५०१-१००० | १००१-१५०० | १५०१-२००० | २००१ पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|
| स्वयंसेवकांची संख्या | २ | ३ | ४ | ५ | ६ |

७. सूक्ष्मनियोजन स्वयंसेवकांची निवड झाल्यावर त्यांना प्रकल्प तोंडओळख विषयक माहिती होण्यासाठी एक तासाचे चर्चासत्र गाव/ गावसमुह/ मंडळ/ तालुका पातळीवर आयोजित करण्यास कृषि पर्यवेक्षक/ मंडळ कृषि अधिकारी यांना सुचित करावे.

८. प्रकल्पाच्या सूक्ष्मनियोजन कामासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

६. प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये मृद व जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यांची प्रभावी अंमलबजावणीसाठी गावस्तरावर स्वयंसेवकांची निवड करण्यात यावी.

प्रकल्पाचा उद्देश सध्या करण्यासाठी प्रत्येक गावामध्ये मृद व जलसंधारण कामे तसेच भूजल पुनर्भरणाची कामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने आणि सदर कामांसाठी लोकांचा सहभाग अत्यंत आवश्यक असल्याने या कामांचे नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये गावातील होतकरू लोकांचा व प्राधान्याने युवकांचा सहभाग अवश्य घेण्यात यावा. याच उद्देशाने प्रकल्पामार्फत प्रत्येक गावातील ४ होतकरू लोकांना पानी फौंडेशनच्या प्रशिक्षकांकडून प्रशिक्षित करण्यात येणार आहे. तरी त्यासाठी प्रत्येक गावातून ४ स्वयंसेवकांची निवड करण्यात यावी. यामध्ये किमान २ महिला असाव्यात.

६. प्रकल्प टप्पा-२ च्या गावांच्या निवड यादीतील बेचिराख/ रिठ/ उजाड गावे व नगरपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका हद्दीत गेलेल्या गावांची माहिती त्वरीत कळविण्यात यावी.

**वरील सर्व उपक्रम मा. मुख्यमंत्री यांचे १०० दिवसांच्या कार्यक्रमात समावेश असल्याने सदर सर्व उपक्रम वेळेवर सुरु करून यशस्वी करण्यात यावेत.**